महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ३० डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस

**महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची आज दि. 30 डिसेंबर रोजी अंतिम मुदत असून आता फक्त काही तास उरले आहेत. मात्र अद्यापही युती आणि आघाडीचे उमेदवार गुलदस्त्यात आहेत. त्यामुळे सर्वच पक्षांतील इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. शेवटच्या क्षणी उमेदवारी जाहीर झाल्यास उमेदवारांची धावपळ होणार आहे. अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने सर्व पक्षांना जागावाटपाचे अधिकृत आकडे व जागा जाहीर कराव्या लागणार आहेत. तसेच शेवटच्या क्षणी गडबड होऊ नये म्हणून उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटपही करावे लागणार आहे. त्यामुळे पक्ष नेतृत्व आणि उमेदवारांसाठी आजचा दिवस निर्णायक ठरणार आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन आणि राजकीय पक्षांची, उमेदवारांची तयारी जोरात सुरु आहे. निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. महायुती आणि महाविकास आघाडी स्थानिक घटकांवर जोर देत वेगवेगळ्या तडजोडी करत आहेत तसंच वेगवेगळ्या नेते पक्षांतर करत आहेत. मुंबईत काँग्रेस आणि बहुजन वंचित आघाडीमधे समेट झाला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवायची ठरवलं आहे. आमदार सना मलिक यांनी आज ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून एकूण १०० जागा लढवणार असल्याचं सांगितलं. रिपब्लिकन पक्षाला किमान १६ जागा महायुतीने द्यावा अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. ऑल इंडिया एमआयएम पक्षाने ठाणे महानगरपालिकेसाठी ५, तसंच वसई विरार महानगरपालिका निवडणुकीसाठी ३ उमेदवार जाहीर केले आहेत. आपला पक्ष भिवंडी निजामपूर तसंच तळोजा इथंही उमेदवार देणार असल्याचं पक्ष प्रवक्ते इम्तियाज जलील यांनी सांगितलं. पिंपरी चिंचवडप्रमाणे पुण्यात शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचे पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत अशी घोषणा आज अजित पवार यांनी केली. पुण्यातही काँग्रेसने बहुजन वंचित आघाडीबरोबर समझोता केला आहे. जळगावात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ३८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३७ जागा लढवणार आहे. सोलापुरात भाजपाबरोबर शिवसेनेची चर्चा निष्फळ ठरली असून तिथं राष्ट्रवादीबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याचं पक्ष प्रवक्ते सिद्धराम म्हेत्रे यांनी सांगितलं. अमरावतीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

## महत्वाचे

### महिला बचतगटाच्या हाती मतदान जनजागृतीची दोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.29 :** आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथकाच्या वतीने उथळसर प्रभाग समितीअंतर्गत (प्रभाग क्र. 10, 11 व 12) आज महिला बचतगटाच्या माध्यमातून सिध्देश्वर तलाव परिसर येथे मतदान जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मतदानाचा अधिकार हा कोणत्याही लोकशाही समाजातील मूलभूत अधिकार आहे. हा आपल्या लोकशाहीचा खरा आधारस्तंभ आहे. मतदान करणे हा केवळ अधिकारच नाही, तर ती आपली जबाबदारी आणि कर्तव्य सुद्धा आहे. त्यामुळे सक्षम लोकशाहीसाठी 'आपल्या मताचे करा दान, ही आहे लोकशाहीची जाण'... हा नारा घेऊन एकता महिला बचतगटातील महिला जेथे वास्तव्य करतात तेथील परिसरात मतदान जनजागृती करत लोकशाहीची ही गुढी उभारण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

### डोंबिवलीतील कार्पोरेट समूहाचा भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** डोंबिवलीतील मानपाडा-घारिवली गाव हद्दीतील शिळफाटा रस्त्यावरील रूणवाल गार्डमधील कार्पोरेट लोकांसह विविध स्तरावरील नागरिकांच्या गटसमूहाने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजप नेते महेश पाटील यांच्या पुढाकाराने दोन दिवसापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विचारसरणी, हिंदुत्व या भाजपच्या धाटणीमुळे आम्ही भाजपमध्ये दाखल होण्याची निर्णय घेतला आहे, असे रुणवाल गृहसंकुल भागात राहणारे सामाजिक कार्यकर्ते हरिष पाटील यांनी माध्यमांना सांगितले. शिळफाटा रस्त्यावरील रुणवाल हा मोठा गृहप्रकल्प आहे. याठिकाणी पाच ते सहा हजाराहून अधिक कुटुंबे रहिवास करतात. बहुतांशी वर्ग मुंबई, ठाणे परिसरातून या भागातून येथे राहण्यास आला आहे. आणि बहुतांशी वर्ग नोकरदार, कार्पोरेट, उद्योजक, व्यावसायिक आहे. या रहिवाशांनी एकत्रितपणे आपण भाजपला पाठिंबा दिला पाहिजे अशी मते व्यक्त केली होती.

### मनपा प्रचारासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे -** बदलत्या काळानुसार अनेक गोष्टी या बदलत असतात सध्या कृत्रीम बुद्धिमत्ताचे युग आले असून याचा पुरेपूर वापर सर्व क्षेत्रात होताना पाहायला मिळत आहे. यंदाच्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतही काही इच्छूक उमेदवारांकडून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे पाहायला मिळत आहे. महापालिका निवडणूका असो वा विधानसभा किंवा लोकसभा निवडणूका उमेदवारांकडून अनेक ठिकाणी पारंपारिक पद्धतीचे निवडणूक प्रचार म्हणजेच ढोल ताशा वाजवणे, बॅनर - पोस्टर धरून दारोदारी मतांचा जोगवा मागत फिरणे. त्यासह मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे असाच प्रचार होताना आतापर्यंत पाहिले आहे. परंतू, गेले काही वर्षात समाजमाध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम रील यामार्फत मोठी प्रसिद्धी मिळत आहे. यंदाच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत देखील समाजमाध्यमांचा प्रचारासाठी वापर झालेला पाहायला मिळाले. परंतू, आता या जोडीला कृत्रीम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सर्वाच क्षेत्रात मोठ्याप्रमाणात केला जात आहे. विशेष करुन तरुण पिढी या तंत्रज्ञानाविषयी अधिक सजग झाली आहे.

### ठाण्यात काँग्रेस स्वबळावर लढणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: ठाणे जिल्ह्यात महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. जागावाटपावरून निर्माण झालेला पेच न सुटल्याने अखेर ठाण्यात महाविकास आघाडीत फूट पडली आहे. ठाणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस ठाण्यात स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली.राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने आम्हाला फसवले काळजात कट्यार घुसली असे म्हणत काँग्रेसचे ठाणे शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने आम्हाला फसवले असून सन्मानजनक जागा न मिळाल्याने काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

## मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाच्या
# धान खरेदी केंद्राचे उद्‌घाटन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



किमान आधारभूत किंमत भात खरेदी हंगाम 2025-26 च्या धान खरेदी केंद्राचे उद्घाटन आज दरवर्षी प्रमाणे तालुक्याचे माजी आमदार गोटिराम पवार यांच्या हस्ते करण्यात आले तर विद्यमान आमदार किसनजी कथोरे हे बदलापूर येथील कार्यक्रमात व्यस्त असल्याने त्यांनी उशिरा येऊन शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

संघाचे प्रशासकीय चेअरमन संतोष पवार यांनी प्रास्ताविकात सांगितले की यावर्षी कोणताही गडबड गोंधळ न होता शांततेत शेतकऱ्यांना टोकन देऊन सात हजार दोनशे शेतकऱ्यांची आनलाईन नोंदणी झाली असुन 80% काम पुर्ण झाले आहे. आजपासून भात खरेदी सुरू होणार असून यावर्षीचा भाताचा 2359 रूपये हमीभाव ठरला आहे परंतू बोनस अजुन जाहीर झाला नाही अशी माहिती यावेळी त्यांनी दिली. तर यावेळी उल्हास बांगर यांनीही शासनाने शेतकऱ्यांना तीन हजार रूपये हमीभाव द्यावा अशी मागणी यावेळी केली.

माजी आमदार गोटिराम पवार यांनी अध्यक्षिय भाषणात केंद्राचा कृषीमुल्य आयोग धान्याचा दर ठरवत असून भाताला 68 रूपये भाववाढ ही शेतकऱ्यांची चेष्टा असून ठाणे जिल्ह्यातील एकमेव मुरबाड तालुका खरेदी विक्री संघ सुस्थितीत आहे. शेतकरी सहकारी संघाच्या जून्या संचालक मंडळावर भ्रष्टाचाराचे आरोप झालेत त्याची चौकशी झाली पाहिजे व बोगस सातबारा हे महसूल विभागाने शोधून काढावेत व कारवाई करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

तर विद्यमान आमदार किसन कथोरे यांनी उशिरा का होईना पण उद्घाटन केंन्द्राला भेट देऊन न मिळणारे पैसे आपण सरकार कडून मिळवून दिले असून शेतकऱ्यांच्या अजूनही काही अडचणी आहेत का याची विचिरपूस करत येणाऱ्या नविन वर्षाच्या व म्हसा यात्रेच्या शुभेच्छा मुरबाड मधील शेतकऱ्यांना व नागरिकांना दिल्या. यावेळी नायब तहसीलदार सौ. सुषमा बांगर,सुभाष पवार, उल्हास बांगर, राजेश पाटील,कांतीलाल कंटे, दिपक खाटेघरे, सुरेश बांगर, दिपक पवार, रामभाऊ दळवी, अनिल घरत, जितेंद्र भावार्थे,संतोष विशे,अशोक मोरे, मोहन भावार्थे, जगदिश हिंदुराव, कांताराम रसाळ,खरेदी विक्री संघाचे प्रशासकीय संचालक रमाकांत सासे, चंद्रकांत बोस्टे,आण्णा शिंगोळे,संतोष भांगरथ, सौ. हर्षला भोईर, भाऊ भोईर, दिनेश उघडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मिलींद मडके यांनी केले.

# जिल्ह्यात बंडखोरीचे संकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** पक्षाकडून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघा एक दिवसाचा कालावधी उरला असताना, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्ष, भाजपकडून अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर होत नाही. शिवसेना शिंदे गट आणि भाजपची युती आहे की नाही हेही युतीचे नेते जाहिरपणे स्पष्ट करत नाहीत. आणि काही प्रस्थापित, नव्या दमाच्या उमेदवारांच्या उमेदवाऱ्या पक्षाने निश्चित करून ठेवल्या आहेत. अशाप्रकारच्या वावड्या रविवारपासून कल्याण, डोंबिवली शहरात पसरल्याने कल्याण, डोंबिवलीतील भाजप, शिवसेना शिंदे गटाच्या इच्छुक उमेदवारांनी पक्षांनी कारवाई केली तरी चालेल पण आम्ही पालिका निवडणूक लढविणार असा आक्रमक पवित्रा घेतला आहे.

या आक्रमक पवित्र्यामुळे शहरात बंडखोरांचे चक्रीवादळ आले आहे. पक्षीय नेते युती आणि जागा वाटपाची ठोस भूमिका घेत नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांची कोंडी झाली आहे. इच्छुक उमेदवार आपल्या कार्यकर्त्यांचे जथ्थे घेऊन आपल्या नेत्यांच्या घराबाहेर आमच्या उमेदवारीचे काय झाले याची विचारणा करण्यासाठी रविवार दिवसभर तळ ठोकून होते.

आपल्या नेत्यांना दाखविण्यासाठी या इच्छुकांनी प्रभागातील आपल्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर कार्यकर्ते, पाठीराखे मतदार नागरिकांना संघटित करून जोरदार शक्तिप्रदर्शन केले आहे.

# युती - आघाडी न झाल्याने सर्वच पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

## प्रचंड शक्तीप्रदर्शनात भिवंडीत पालिकेसाठी भाजपा उमेदवारांचे अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी) :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे पडघम जोमामध्ये वाजू लागले असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी भाजपाचे उमेदवारांनी महायुतीची वाट न पाहता जोरदार शक्ती प्रदर्शन करीत आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन दाखल केले आहेत त्यामुळे एकनाथ शिंदे शिवसेना गटात सन्नाटा आहे.भिवंडीत महापालिका निवडणुक निमित्ताने शिवसेना व भाजप महायुती व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस,समाजवादी पक्ष पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडी करणे संदर्भात स्थानिक नेत्यांनी चर्चा सुरू केली होती मात्र चर्चेदरम्यान कोणत्याही प्रकारचा मार्ग न निघाल्याने अखेर शिवसेना (ठाकरे) पक्ष व मनसे वगळता सर्वच पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढविण्यासाठी आपापल्या उमेदवारांना एबी फॉर्म देऊन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे आदेश दिले आहेत त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात केली आहे.



**भिवंडी मध्ये शिवसेना, भाजपा महायुती होणार असल्याची चर्चा होती त्यानुसार बैठका सुरू होत्या मात्र अखेरपर्यंत याबाबत कोणताच निर्णय झाला नसल्याचे समजते तसेच काँग्रेस,समाजवादी पक्ष,शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सुद्धा स्वबळाची घोषणा करत आपापल्या उमेदवारांना एबी फॉर्म देऊन उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे त्यामुळे भिवंडीत आघाडी व महायुती सध्या तरी झालेली नसल्याचे चित्र आहे.**

भिवंडीतील कामतघर, कोंबडपाडा,मिल्लत नगर, भादवड, अशा विविध भागातील निवडणूक कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भाजप, समाजवादी पक्ष, काँग्रेस शिवसेना अशा विविध पक्षाचे व अपक्ष उमेदवारांनी गर्दी केली होती भाजपाने आपल्या उमेदवारांची घोषणा केली नसली तरी प्रमुख उमेदवारांना एबी फॉर्म दिले असल्यामुळे कामतघर ताडाळी या परिसरातील भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक निलेश चौधरी,नारायण चौधरी यांच्या नेतृत्वाखालील उमेदवारांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडे दाखल केले आहेत. ताडाळी या परिसरामध्ये गेल्या 25 वर्षापासून नेतृत्व करणारे निलेश चौधरी व त्यांच्या सोबतच जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी,भारती चौधरी व दिव्या पाटील या चौघांना भाजपाने प्रभाग क्रमांक 23 साठी उमेदवारी जाहीर केली आहे. ताडाळी,कामतघर,अंजूरफाटा परिसरातील सर्वांगीण विकास करीत असताना या भागातील वऱ्हाळ तलाव सुशोभीकरण, युवकांना रोजगाराची संधी देण्यासाठी आमचा प्रयत्न असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले आहे.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाचा
# 27 गाव सर्वपक्षीय हक्क संघर्ष समितीला पाठिंबा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : 27 गावांची स्वतंत्र नगरपालिका व्हावी या मागणीवर सर्व पक्षीय हक्क सरंक्षण संघर्ष समिती ठाम असून कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूकीत 27 गावांमधील प्रभागात निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन संघर्ष समितीतर्फे करण्यात आले आहे. समितीच्या या आवाहनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. वंडार पाटील यांनी पाठिंबा दिला असून इतर कोणत्याही पक्षाने 27 गावांमध्ये उमेदवार न देण्याचे आव्हान पाटील यांनी केले आहे. मात्र 27 गावांमधील प्रभागात कोणी उमेदवार दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष पूर्ण ताकदीने उतरणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला आहे.**

### 27 गावांत उमेदवार न देण्याचे आवाहन

**********

### मात्र कोणी उमेदवार दिल्यास संपुर्ण ताकदीने उतरण्याचा जिल्हाध्यक्ष डॉ. वंडार पाटील यांचा इशारा

- **२७ गाव संघर्ष समितीकडून KDMC निवडणुकीवर बहिष्काराचे आवाहन**
- **६ पॅनलवर थेट परिणाम**
- **प्रभागातील राजकीय गणिते बदलणार उमेदवारी दाखल केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा**

२७ गावांची स्वतंत्र नगरपालिका व्हावी ही मागणी समितीने सरकारकडे लावून धरली होती. मात्र सरकारने मागणीचा विचार केला नाही. २७ गावातील नागरीकांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे सर्व पक्षीय राजकीय नेते पदाधिकारयांनी आणि इच्छूक उमेदवारांनी कल्याण डोंबिवली महापालिका निवडणूकीवर बहिष्कार घालावा असे आवाहन सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने केले आहे. निवडणूक लढविण्याची तयारी दाखविली तर समिती त्यांच्या विरोधात समिती सक्रीय भूमिका घेणार असल्याचा इशारा समितीचे पदाधिकारी सुमित वझे यांनी दिला आहे. समितीने हा निर्णय घेतल्याने केडीएमसीच्या १३,१६,१७,१९,३०,३१ या सहा पॅनलवर परिमाण होणार आहे. तर समितीच्या या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पाठिंबा दिल्याने इतर राजकीय पक्ष काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याण पूर्वेत भाजपा उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप

## आमदार सुलभा गायकवाड यांच्याहस्ते देण्यात आले एबी फॉर्म

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आगामी होणाऱ्या कल्याण–डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्रातील भाजपा उमेदवारांना कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले.

भाजपाच्या वतीने कल्याण पूर्वेत मनीषा गायकवाड, हेमलता पावशे, सरोज राय, डॉ. पूजा गायकवाड, स्नेहल मोरे, इंदिरा तरे, रेखा चौधरी, प्रणाली जोशी तसेच विक्रम तरे यांना आमदार जनसंपर्क कार्यालयात पक्षादेशानुसार भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार म्हणून ए-बी फॉर्मचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी कल्याण जिल्हा निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी, भाजयुमो जिल्हाध्यक्ष वैभव गायकवाड, कल्याण पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख संजय मोरे, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, मनोज राय, उद्योगपती संजय गायकवाड, मंडळ अध्यक्ष संतोष शेलार, नितेश म्हात्रे, विजय उपाध्याय, विजय जोशी, यशोदा माळी तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



लोकाभिमुख विकास, पारदर्शक प्रशासन आणि सक्षम नेतृत्वाच्या बळावर सर्व उमेदवार जनतेचा विश्वास संपादन करतील, असा विश्वास यावेळी आमदार गायकवाड यांनी व्यक्त केला.





जीवनदीप महाविद्यालय म्हसाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित

# कान्होळ गावात निवासी श्रमसंस्कार शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

दर वर्षी राष्ट्रीय सेवा योजना विभाग निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करीत असते, विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांचा समाजसेवा करण्याकडे कल वाढावा याच अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर (युवकांचा ध्यास - ग्राम-शहर विकास) हे सोमवार दि. २२ डिसेंबर ते रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ या दरम्यान कान्होळ गाव येथे घेण्यात आले. या शिबिराच्या उद्धाटना प्रसंगी मुरबाड पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. श्री. संदीपान सोनावणे साहेब, कान्होळ ग्रामपंचायतीचे सरपंच मा. सौ. रेश्मा घरत, उपसरपंच मा. सौ. शोभा देसले, माजी सरपंच मा. श्री. रघुनाथ कुर्ले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. श्री. एकनाथ देसले सर, कान्होळ जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. गुरुनाथ अंबारे सर, जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. योगेश माळी सर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सकाळी ११.०० वाजता शिबीराचे उद्धाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उद्धाटनप्रसंगी मान्यवरांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. मान्यवरांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे समाजसेवेची जाणीव,





शिस्त, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारीची जडणघडण करणारे व्यासपीठ असल्याचे सांगितले. ग्रामविकास, स्वच्छता, श्रमदान, सामाजिक ऐक्य आणि युवकांच्या सक्रिय सहभागावर त्यांनी भर दिली या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस स्वयंसेविका कु. प्राची घरत हिने केले.

या सात दिवसीय शिबीर कालावधीत विविध सामाजिक कार्य करण्यात आले. कान्होळ गावाचा प्रवेश रस्ता, गावातील मंदिरापर्यंतचा मार्ग तसेच जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीच्या परिसरात साफसफाई व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच ग्रामस्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, रस्त्यावरील कचरा, प्लास्टिक, झाडांची सुकलेली पाने गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. मंदिर परिसर व शाळेच्या नवीन इमारतीभोवती स्वच्छता करून परिसर स्वच्छ व आकर्षक बनविण्यात आला. त्याचप्रमाणे पाणी आडवा पाणी जिरवा या माध्यमातून पाटबंधारे उभारणी करण्यात आली तसेच समाज जागृती अभियान अंतर्गत पथनाट्य, रॅली काढण्यात आली. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे तसेच श्रमदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या दरम्यान विद्यार्थ्यांसाठी नवनवीन विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यानांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या शिबीरात राष्ट्रीय सेवा योजना विभागातील एकूण ४० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला ज्यात १८ मुली आणि २२ मुले यांचा समावेश होता. हे शिबीर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा. कन्या हरड मॅडम तसेच प्रा. दिपक शेळके सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला त्यांच्या मार्गदर्शनामुळे स्वयंसेवकांमध्ये शिस्त, संघभावना व सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली. सातव्या दिवशी म्हणजेच दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी शिबीराचा सांगता सभारंभ पार पडला या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, प्राचार्य प्रा.योगेश माळी सर, कान्होळ गावच्या सरपंच मा. सौ. रेश्मा घरत उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या कामा बद्दल कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत राबविण्यात आलेले हे निवासी शिबीर समाजहितासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. यामुळे “स्वच्छ गाव – सुंदर गाव” ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आली.

या निवासी शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. कन्या हरड मॅडम, प्रा. दिपक शेळके सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. अशा रीतीने अगदी उत्साहपूर्ण वातावरणात हे सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर पार पडले.

# एबी फॉर्म कोणाला द्यावे ?

## राजकीय पक्ष व उमेदवारांमध्ये गोंधळाची स्थिती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : जसजशी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या 15 जानेवारीच्या निवडणुकीची तारीख जवळ येऊ लागली आहे तस तशी राजकीय पक्ष व उमेदवारांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झालेली दिसून येत आहे. गोंधळ असा की एबी फॉर्म कोणाला द्यावयाचे पक्षनिष्ठ कार्यकर्त्याला ही आयाती इच्छुकाला हे कोडे अद्याप सुटलेले दिसून येत नाही . युती आघाडीतील जागा वाटपाचा खेळ अद्याप संपलेला नाही . प्रत्येक पक्ष आपापल्या पक्षाचे समर्थन करण्यास व व जास्तीत जास्त जागा मिळविण्यात कट शहा राजकारणात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना गती देण्यात येत आहे इच्छुक उमेदवारांचा संपर्क वाढवण्यासाठी उमेदवाराच्या पाठीराख्यांचा राबता सुरू झाला आहे मुलाखतीमध्ये न केलेल्या प्रभाग कामांबाबतचाही अंतर्भाव होत असल्याचे उघड होत आहे तरीही सामान्य पक्षनिष्ठ उमेदवाराला उमेदवारी मिळणे अडचणीचे ठरू पाहत आहे निवडणूक लढण्यासाठी आर्थिक क्षमतेची ताकद विचारात घेतली जात असल्याने धनवानांच्या जास्तीत जास्त संधी देण्याची व्यवस्था राजकारणात सामावलेली दिसून येत आहे त्यामुळेच कार्यकर्त्यांमध्येही गोंधळाची स्थिती जाणवत आहे . शासन निवडणूक विभागाकडून चौक व्यवस्थेचे समर्थन होत असले तरी नवनवीन होत असणाऱ्या उमेदवारांबाबतच्या उमेदवारी संदर्भात होणाऱ्या घोषणांच्या पूर्ततेबाबत उमेदवारांची धडपड सुरू झालेली आहे 31 तारखेला नामनिर्देशन फॉर्म भरण्याची अखेरची मुदत आहे फॉर्म 19 पाणी असल्याने बरेली व पुरवण्या जोडणे याबाबत उमेदवारांची दमछाक सुरू असल्याचे दिसून येत आहे 27 गावांसाठी स्थापन झालेल्या सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने मतदानावर बहिष्कार टाकण्याचे शस्त्र उघडल्याने पॅनल क्रमांक 13 16 17 19 30 व 31 या विभागातील मतदानावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे केंद्रीय मतदार यादी 3 जानेवारीला प्रसिद्ध केला जाणार असून इच्छुक उमेदवारांमध्ये उत्सुकता असली तरीही त्यापूर्वीच उमेदवारांची निवड निश्चित होणार असल्याने प्रचारासाठी थोडाच अवधी मिळत असल्याची तक्रार उमेदवारांमध्ये दिसून येत आहे चार उमेदवारांचे पॅनल असल्याने चारही उमेदवारांच्या बाबतीत खर्चाचा भाग पॅनल प्रमुख म्हणणाऱ्यांनाच करावा लागणार असल्याची ही चर्चा आहे कल्याण डोंबिवली महापालिकेच्या होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मनसे व ठाकरे सेना एकत्रित लढत देणार असून मनसेला 55 तर ठाकरे सिनेमा 67 जागा वाटप होऊन प्रचार एकत्रित करण्याचे एकमत झालेले आहे दुसरीकडे महायुतीची बोलणी अंतिम झाल्याचे घोषित झाले असले तरी भाजपाला मिळालेल्या जागांबाबत कल्याण पूर्व बागेतील भाजप कार्यकर्ते नाराज असल्याचे दिसून येत आहे भाजपला 58 तर शिवसेनेला मिळालेला 64 जागा याबाबत झालेला निर्णय मान्य न झाल्याने त्यातही कल्याण पूर्वेतील भाजप कार्यकर्ते नाराज दिसून येत आहेत . कल्याण पूर्व येथील भाजप पक्षाला केवळ सात जागा मिळाल्याने कल्याण पूर्व येथील भाजप पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करून स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्धार जाहीर केला आहे . त्यातच महायुतीमध्ये ह्या विभागातून कोणताही सहभाग दाखविला न गेल्याने राष्ट्रवादी कॉँग्रेसला स्थान न मिळाल्याने किमान दहा ते बारा नामनिर्देशित अर्ज भरण्याचा संकल्प जाहीर झाल्याने ह्या युतीचा विचका होण्याचे संकेत मिळत आहेत . कल्याण डोंबिवली महापालिकेच्या या निवडणुकीसाठी 489 नाम निर्देशन पत्रांचे 27 डिसेंबर अखेर वितरण झाले असून प्रभाग पाच व सात मध्ये अपक्ष तीन व शिवसेना एक अशा चार उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज निवडणूक विभागाकडे प्रमाणित झाल्याची माहिती मिळाली आहे . मंगळवारी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून निवडणूक विभागाकडून आलेल्या आजांची योग्य ती छाननी करण्यासाठी स्वतंत्र झालं उघडण्यात आल्याचे दिसून येत आहे .

# संदेश पाटील यांचे तिकीट नाकारले

## नागरिकांशी संवाद साधूनच पुढील निर्णय घेणार संदेश पाटील यांचे स्पष्ट मत



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

संदेश पाटील यांना तिकीट नाकारल्याने प्रभाग भावनांनी भारावला; नागरिकांशी संवाद साधूनच पुढील निर्णय घेणार असल्याचे संदेश पाटील यांचे स्पष्ट मत प्रभागातून संदेश पाटील यांना उमेदवारीचे तिकीट न मिळाल्याने संपूर्ण प्रभागात भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रभागातील नागरिकांनी एकत्र येत संदेश पाटील यांची भेट घेतली. या वेळी नागरिकांमध्ये प्रचंड भावनिक प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळाल्या. या भेटीदरम्यान अनेक नागरिक भावूक झाले होते. काहींच्या डोळ्यांत पाणी तर काहींच्या आवाजात आक्रोश होता. “आमच्यासाठी सातत्याने झटणारा नेता आम्हाला हवा आहे” अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. नागरिकांनी एकमुखाने ठाम भूमिका घेत घोषणा केली की, “संदेश पाटील नसतील, तर आम्ही कोणत्याही उमेदवाराला मतदान करणार नाही.” या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या वेळी संदेश पाटील यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. नागरिकांचा भावनिक पाठिंबा पाहून तेही काही क्षण भावूक झाले. त्यांनी यावेळी स्पष्ट केले की, पुढील कोणताही निर्णय नागरिकांशी सविस्तर संवाद साधूनच घेतला जाईल. या घटनेमुळे प्रभागातील राजकीय वातावरण तापले असून, नागरिकांची एकजूट आणि भावना लक्षात घेता, येत्या काळात याचे दूरगामी राजकीय परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाण ठेवावी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : समाजसेवेची जाण ठेवून सामाजिक जबाबदारीचे भान जपण्याच्या व त्यातून सामाजिक नेतृत्वाचा विकास साधण्याची संकल्पना राबविणारी शैक्षणिक व्यवस्था निर्माण होण्याची गरज असल्याची भावना कल्याण पूर्व येथील महिला आमदार सुलभा गायकवाड यांनी व्यक्त केली मलंगड वाडीलगच्या द्वारली येथील इंद्रायणी शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रशिक्षण देणाऱ्या विद्यार्थी शिबिराचे उद्धाटन प्रसंगी त्यांनी ही भावना व्यक्त केली .सात दिवसाच्या या प्रशिक्षण शिबिरामध्ये सामाजिक उपक्रम तसेच नेतृत्वाचे अवलोकन शिवाय जीवन कौशल्य प्रशिक्षण अशा विविध अंगाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे .समाजसेवेची आवश्यकता किती महत्त्वाची आहे याबाबतच्या जबाबदारीची जाणीव व नेतृत्वगुणांची जोपासना याबाबत एडवोकेट मारुती पाटील यांनी सोप्या भाषेत आपले अनुभवही कथन केले .शिवाय या महाविद्यालयाकडून विद्यार्थी विकासाबाबत सुरू असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेऊन त्याबाबतही त्यांनी कौतुक केले शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना उद्भवणाऱ्या अडचणीवर मात करण्याचे व त्यातून यश मिळवण्याचे ध्येय ठेवण्याचे व जिद्द बाळगण्याचे आवाहनही विद्यार्थ्यांना त्यांनी केले आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व्यवस्था व उपक्रमाबाबत माहिती देताना डॉक्टर विकास गायकर यांनी एनसीसी सारख्या कॅडेट संकल्पनेतून होणाऱ्या सर्वांचे विकासाबाबत त्यांनी होत असणाऱ्या मानसिक व सामाजिक जडणघडण बनवण्यास मदत असल्याचे स्पष्ट केले परदेशी प्राध्यापकांचे मार्गदर्शन किती लाभदायक असते याचा अनुभव विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाने दिल्याचेही प्राचार्य डॉक्टर लीना

**- आमदार सुलभा गायकवाड**

गायकर यांनी सांगताना एनसीसी प्रशिक्षण ही एक सामाजिक चळवळ असल्याचे व शिक्षणामध्ये तिचे महत्व असल्याचे स्पष्ट केले या उपक्रमाला बँकेचे माजी व्यवस्थापक यशवंत पाटील प्राध्यापक उल्हास गायकर विजया पाटील डॉक्टर गणेश पाटील मधुकर पाटील लक्ष्मण पाटील जयवंत मोरे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षाली पाटील व श्रेयस्वी उपाध्याय यांनी केले युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाण ठेवावी.

# कल्याण मनपा मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मतदान अधिकारी व मतदान कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण शनिवार दि.२७ डिसेंबर २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी दोन सत्रात पार पडले. कल्याण पश्चिम येथील आचार्य अत्रे रंगमंदिर तसेच बिर्ला वन्य, के.डी. एम.टी इमारत शहाड, पेंढारकर कॉलेज डोंबिवली पूर्व आणि पाटकर शाळा ,डोंबिवली पूर्व येथे हे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.

या प्रशिक्षण वर्गात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूकीची प्रक्रिया, चार पॅनल पध्दती, आदर्श आचार संहिता, मॉकपोलची प्रक्रिया इ. बाबतची सविस्तर, मुद्देसुद माहिती तसेच पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरणही केले. या प्रशिक्षणामध्ये पायाभुत प्रशिक्षण व ईव्हीएम प्रशिक्षण अशा स्वरुपातील प्रशिक्षण उपस्थित मतदार अधिकारी व मतदार कर्मचारी यांना देण्यात आले.

प्रशिक्षण वर्गास अनुपस्थित राहिलेल्या व अनुपस्थितीचे सबळ कारण देऊ न शकलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गावर नोटीस बजावून लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाणार असल्याची माहिती महापालिका उप आयुक्त वंदना गुळवे यांनी दिली आहे.

# वझे महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मदतीचा एक हात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : बेघरपणा हा समाजातील उपेक्षिततेचा सर्वात वाईट प्रकार आहे. अत्यंत गरिबी, उच्च पातळीची असमानता आणि भेदभाव ही बेघर होण्याची प्राथमिक कारणं आहेत. बालपणच हरवून बसलेली, दुर्बल स्तरातली मुलं लहान वयात विविध कारणांमुळे घरापासून दुरावलेली असतात, स्टेशन किंवा फुटपाथवर राहणारी, पोटाची खळगी भरण्यासाठी राबणारी जगण्यासाठी पावलोपावली जीवघेणा संघर्ष करणाऱ्या या मुलांना मानसिक आधार, सर्व मानवी हक्कांपासून दूर होऊ न देणं, त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होणार नाही याची काळजी घेणे आणि त्याचबरोबर त्याला डोक्यावर छप्पर देणं असं सामाजिक कणव असलेले काम जीवन संवर्धन फाउंडेशनच्या वतीने गेली अनेक वर्षे होत आहे. वझे उत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत “स्नेहाची साथ मदतीचा एक हात” हा विशेष उपक्रम नुकताच यशस्वीरीत्या राबविला आहे, या माध्यमातून संस्थेच्या कामाची माहिती आम्हाला जवळून घेता आली. सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेतून जगण्यातला आनंद हा नाव, पैसा, प्रसिद्धी, लौकिक ह्याच्या पलीकडे अनुभवायचा असेल तर ह्या लेकरांकडे बघून तो घेता येतो आणि आपण किती सुखात राहतो तरीही तक्रारी करत फिरतो ह्याची वारंवार आठवण होत राहते. अशी भावना प्रा. निकिता माने यांनी व्यक्त केली. वझे महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. (डॉ.) प्रिता निलेश तसेच व्यवस्थापन सचिव मा. डॉ. बी. बी. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली "जीवन संवर्धन फाउंडेशन" गुरुकुल संचलित, म्हस्कळ, टिटवाळा, जिल्हा ठाणे या संस्थेला भेट देण्यात आली. त्या पुढे असेही म्हणाल्या की, आमच्याकडून काही भेटवस्तू देण्यात आल्या परंतु वस्तूंच्या देवाणघेवाणपेक्षा देश तिसरी महासत्ता बनण्याच्या दिशेने प्रगती करीत असला तरी समाजातला हा एक गंभीर आजार खोलवर रुजला आहे, त्याची व्यापकता आणि संस्थेचे सेवाभावी कार्य यनिमित्ताने आम्ही समजून घेऊ शकलो. त्याचबरोबर माणुसकी, आपुलकी,सामाजिक जबाबदारीची जाणीव व्यक्त करणारे अल्पसे कार्य आमच्या हातून घडले. शिक्षणमहर्षी भाऊसाहेब वझे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून चांगला विद्यार्थी आणि त्यातून राष्ट्रकार्यासाठी सदैव सामाजिक सजग भान जपणारा नागरिक घडावा याहेतूने शिक्षण संस्था काढली. आम्हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून सामाजिक जाणीवा वाढविणारे अत्यंत प्रेरणादायी आणि संवेदनशील काम आज घडले. "वझे उत्सव" हा नुसता स्पर्धाचा कार्यक्रम नाही तर त्यातून संस्कृतीचे मूल्य वाढवणारा महाविद्यालयीन कार्यक्रम घडला याचा आज आम्हाला आनंद होत आहे. मुलुंड येथील केळकर शिक्षण संस्था संचलित विनायक गणेश वझे महाविद्यालय (स्वायत्त) येथे सालाबाद प्रमाणे वझे-उत्सव २०२५-२६ हा उपक्रम दि. २७ नोव्हेंबर २०२५ ते दि. २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवा अंतर्गत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आणि या स्पर्धांना विविध महाविद्यालयांतून दरवर्षी प्रमाणे उत्स्फूर्त आणि प्रचंड प्रतिसाद लाभला. यावेळी श्री. दिलीप पवार आपले विचार मांडताना म्हणाले की, विज्ञानवादी दृष्टिकोन, कला, एकत्र खेळ, चिकित्सक, विजिगीषु वृती आणि सर्वसमावेशक संस्कृतीमुळे आपण सर्वच माकडांपासून माणसात आलोय. एकमेंकांची साथ देणं, घेणं आणि सामाजिक जाणिवेतून समाज घडतो याचे भान राखणे हे महत्वाचे आहे. मानवी उत्क्रांतीचा पाया अशा प्रायोरिटी कळण्यातूनच सूरू होतो. देणारा हा कायम सर्वश्रेष्ठच असतो. मग तो आधाराचा शब्द असो वा अडचणीच्या वेळी दिलेला मदतीचा हात...! वझे उत्सव कमिटीने याच भावनेने मनाला समाधान देणारा कार्यक्रम केला. यावेळी "जीवन संवर्धन फाउंडेशनच्या" वतीने चालविण्यात येणाऱ्या बेघर अनाथ मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या आवश्यक गरजे नुसार २० बेंचेस,टी व्हि संच, शुद्ध थंड / साध्या पाण्याचा कुलर, ब्लँकेट्स, टी-शर्ट्स तसेच मिठाई देण्यात आली. हा सामाजिक उपक्रम यशस्वी व्हावा यासाठी महाविद्यालयाचे अधिक्षक श्री. संतोष डगळे तसेच वझे उत्सव कमिटीचे अध्यक्ष श्री. गोविंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली अनेकांनी उल्लेखनिय काम केले. त्यांच्या प्रभावी नियोजनामुळे व समन्वयामुळे आणि केळकर-वझे महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी परिवारामुळे हा प्रेरणादायी उपक्रम अत्यंत नियोजितरित्या, शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडला.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



मंगळवार
३० डिसेंबर २०२५

### मेष
तुमच्या व्यवसायात नवीन संधी उपलब्ध होतील, ज्यामुळे उत्पन्नाचे स्रोत वाढतील. कौटुंबिक जीवनात सुख-शांती नांदेल. एखादे शुभ कार्य करु शकता. .

### वृषभ
तुम्ही नवीन उपक्रम किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी पावले उचलल्यास त्यात यश मिळण्याची दाट शक्यता आहे. सहलीचे नियोजन करु शकता.

### मिथुन
मन प्रसन्न असल्याने तुम्ही कठीण कामेही सहजपणे पूर्ण करु शकाल. बोलण्याच्या कौशल्यामुळे समाजात तुमचा मान वाढेल. प्रलंबित कामे वेगाने मार्गी लागतील.

### कर्क
नवीन व्यवसायाची पायाभरणी करण्यासाठी आजचा काळ अनुकूल आहे. मात्र, तुमच्या पत्नीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. सहकाऱ्यांशी मतभेद होऊ शकतात.

### सिंह
कामाच्या ठिकाणी तुम्ही काही कठोर किंवा मोठे निर्णय घ्याल, ज्याचे सकारात्मक परिणाम तुम्हाला दीर्घकाळ मिळत राहतील. कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल.

### कन्या
व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाच्या व्यक्तीची भेट भविष्यात मोठा आर्थिक फायदा मिळवून देणारी ठरेल. सहकाऱ्यांकडून अपेक्षेपेक्षा जास्त मदत मिळेल.

### तुळ
नवीन घर किंवा जमीन खरेदी करण्याचे तुमचे स्वप्न आज पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल करेल. मनामध्ये अज्ञात भीती आणि अस्वस्थता जाणवेल.

### वृश्चिक
कामानिमित्त एखादा लांबचा प्रवास करावा लागण्याची शक्यता आहे. जो थकवा देणारा ठरेल. विरोधकांशी तडजोड करावी लागेल किंवा नम्र राहावे लागेल.

### धनु
जवळच्या व्यक्तीच्या किंवा विशेषतः पालकांच्या अचानक बिघडलेल्या प्रकृतीमुळे तुमची चिंता वाढू शकते. महत्त्वाकांक्षी प्रकल्प आज हाती घ्याल.

### मकर
बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली कामे आज यशस्वीपणे पूर्ण होतील. ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. नोकरदारांसाठी दिवस उत्तम आहे.

### कुंभ
तुमचे सहकारी तुमच्या कामाच्या पद्धतीवर खुश असतील. तुम्हाला सहकार्य करतील. आर्थिक चणचण भासल्यास मित्रांकडून वेळेवर मदत मिळण्याची शक्यता आहे.

### मीन
चालू असलेल्या कामात अचानक अडथळे आल्यामुळे तुमचा हिरमोड होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी विरोधक तुमच्याविरुद्ध सक्रिय राहतील.

# नियमांचा भंग करून रात्रीच्या वेळी बेकायदेशीर रस्ते खोदकाम

## ठेकेदारा विरुद्ध भिवंडीत गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी) :** भिवंडी शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा व नियमांचा भंग करून रात्रीच्या वेळेस सार्वजनिक रस्त्यावर खोदकाम करून नागरिकांची शांतता भंग केल्याचा एक गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भिवंडी शहर पोलिसांनी महानगरपालिका ठेकेदारविरोधात भारतीय दंड संहिता आणि महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.शहरात अनेक ठिकाणी मध्यरात्रीच्या वेळी रस्त्यांची अथवा अनधिकृत इमारतींची बांधकामे सुरु असतात.याबाबत महापालिका प्रशासनाकडे तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष होत आहे. या बांधकामाबाबतीत पोलिसांकडे माहिती दिल्यावर कारवाई केली जाते असे नागरिकांकडून सांगितले जाते.त्यामुळे महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहर पोलीस ठाण्यात तक्रारदार पोलिस कॉन्स्टेबल विशाल सोपान कामतकर (३२) यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे की, २६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२:३० ते १:३० वाजे दरम्यान फुलेनगर परिसरातील बुद्धविहार येथील सार्वजनिक रस्त्यावर महापालिकेचे ठेकेदारा मार्फत रस्त्याचे खोदकाम व रस्त्याचे डांबरीकरण केले जात होते.हे रस्त्याचे काम करताना वाहतूक पोलिसांची परवानगी घेतले नव्हती. कंत्राटदार जड यंत्रसामग्रीचा वापर करून रस्ता खोदत होता. ज्यामुळे मोठा आवाज आणि गोंधळ निर्माण होत होता,ज्यामुळे सार्वजनिक शांतता भंग पावत होती. या कामामुळे रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता आणि जवळच्या रहिवाशांची झोप उडाली होती.या बेकायदेशीर कृत्यामुळे दोन समुदायांमध्ये संघर्ष होण्याची शक्यता निर्माण झाली. ज्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हे काम रात्रीचे होत असल्याने ते कोणत्याही परवानगी शिवाय केले जात होते,या बाबत नागरिकांनी संशय व्यक्त केला.त्यामुळे या प्रकरणी महापालिकेचे ठेकेदार पियारा कन्स्ट्रक्शनचे मालक, ठेकेदार आणि कामगार यांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# एचआयव्ही बाधितांच्या जीवनात नवी पहाट

## कल्याण डोंबिवली महापालिकेच्या 'वधू-वर मेळाव्या'ला संपूर्ण महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग आणि ART विभागाच्या पुढाकारातून आणि नेटवर्क इन ठाणे बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही/एड्स (NTP+) या संस्थेच्या सहकार्याने एचआयव्ही उपचार घेत असलेल्या व्यक्तींसाठी आयोजित राज्यस्तरीय वधू-वर मेळावा शनिवार दि २७ डिसेंबर रोजी यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमास संपूर्ण महाराष्ट्रातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून, एकूण २२४ उमेदवारांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला.

या मेळाव्यासाठी केवळ ठाणे,मुंबई जिल्ह्यातूनच नव्हे, तर महाराष्ट्राच्या विविध भागांतून उमेदवार सहभागी झाले होते. एचआयव्ही बाधित व्यक्तींमध्ये वाढत असलेला आत्मविश्वास, सामाजिक स्वीकार आणि मुख्य प्रवाहात येण्याची तयारी या सहभागातून स्पष्टपणे दिसून आली.

सन २००४ मध्ये स्थापन झालेली NTP+ संस्था गेल्या दोन दशकांपासून एचआयव्ही बाधित व्यक्तींच्या हक्क, सन्मान व पुनर्वसनासाठी कार्यरत असून, सध्या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमध्ये विस्तारलेले आहे. विविध क्षेत्रीय उपक्रमांद्वारे आणि आरोग्य यंत्रणेशी समन्वय साधत संस्था एचआयव्ही बाधितांना सामाजिक व मानसिक आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ART विभाग रुक्मिणीबाई रुग्णालय येथून HIV बाधित रुग्णांना नियमित उपचार दिले जातात. सद्यस्थितीत महापालिकेचे समुपदेशन आणि तपासणी केंद्र बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, शास्त्रीनगर रुग्णालय आणि गीता हरकिसनदास दवाखाना कोळशेवाडी या ३ ठिकाणी कार्यरत आहे.

कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शन करताना मान्यवरांनी नमूद केले की, "एचआयव्ही ही आता प्रभावी उपचारांमुळे नियंत्रणात ठेवता येणारा आजार आहे. नियमित उपचार, वैद्यकीय सल्ला आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे एचआयव्ही बाधित व्यक्तीही निरोगी, सन्मानजनक व सुखी वैवाहिक आयुष्य जगू शकतात."

या वधू-वर मेळाव्यामुळे समाजातील भीती, कलंक आणि गैरसमज दूर करण्यास मदत होणार असून, सहभागी उमेदवारांचे धैर्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. ART विभाग, KDMC आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात आलेला हा उपक्रम एचआयव्ही बाधित व्यक्तींच्या जीवनात नव्या आशेची दारे उघडणारा ठरेल.

## भिवंडीच्या माजी महापौरांविरोधात

# आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. परंतु अजून निवडणूक प्रचाराची रंगत चढणे बाकी असतानाच भिवंडीत आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी माजी महापौर विलास पाटील व इतर चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी सायंकाळी सात वाजता म्हाडा कॉलनी या भागात खडी टाकून रस्ता बनवण्याचे काम सुरु होते. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मधील संगम पाडा रोड परिसरात हे काम सुरू असल्याबाबत तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आल्यानंतर भरारी पथक क्रमांक ५ मधील कर्मचारी बिट निरीक्षक हनुमान म्हात्रे व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी तेथे रस्ता बनविण्याचे काम करणारे इरफान हबीब अन्सारी व डंपर चालक जाहिरुद्दीन जमीर अन्सारी यांना काम कोण करीत आहे याबाबत विचारणा केली. त्यांनी तेथे उभ्या असलेल्या अब्दुल रज्जाक बेग या व्यक्ती कडे बोट दाखवून त्याने काम करण्यास सांगितले असल्याचे भरारी पथकासमोर सांगितले. त्याच्या कडे चौकशी केली असता त्याने माजी महापौर विलास पाटील व त्यांचा मुलगा मयुरेश यांनी या भागात रस्ता बनवण्याचे काम करण्यास सांगितल्यानचे स्पष्ट केले. आचारसंहिता भरारी पथकाने हे काम बंद पाडून भरारी पथक प्रमुख हनुमान म्हात्रे यांनी निजामपूर पोलिस ठाण्यात विलास पाटील, मयुरेश पाटील यांसह इरफान हबीब अन्सारी व जाहिरुद्दीन जमीर अन्सारी अशा चार जणांनी रस्त्याचे काम करून मतदार यांना मतदान करावे या उद्देशाने निवडणुक आयोगाची परवानगी न घेता आचार संहिता दरम्यान सार्वजनिक रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करीत आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार दिल्याने निजामपूर पोलिस ठाण्यात चार जणांविरोधात भा. न्या. संहिता २२३, २८५, लोकप्रतिनिधी अधिनियम कलम १२३ सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अपघात रोखण्यासाठी तळीरामांना घरपोहोच पोहचवण्यासाठी वाहनांची सोय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे :** थर्टी फर्स्टच्या रात्री मद्यपार्टीनंतर होणारे वाहन अपघात रोखण्यासाठी ठाणे पोलिसांनी मद्यविक्री करणाऱ्या बारमालकांना ग्राहकांच्या वाहनांसाठी चालकाची व्यवस्था करावी आणि त्यांना सुखरूप घरी सोडावे अन्यथा मद्यविक्री करू नये, अशी तंबी दिली आहे. पोलिसांच्या या तंबीवर हॉटेलमालकांनी अभिनव उपाय शोधून काढला असून थर्टी फर्स्टला मनसोक्त पिऊन टल्ली होणाऱ्या तळीरामांसाठी घरपोहोच पोहचवण्यासाठी वाहनांची सोय अशी स्किमच जाहीर केली आहे. नववर्ष स्वागताच्या निमित्ताने थर्टी फर्स्टच्या रात्री अनेक ठिकाणी करमणूक कार्यक्रम तसेच मेजवान्यांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमध्ये ओल्या पार्त्या रंगतात. अशा पार्थ्यांना हजेरी लावणारे तळीराम दारूच्या नशेत गाडी चालवून अपघातांस कारणीभूत ठरतात. त्यामुळे नशेत वाहन चालवणाऱ्यांच्या जिवावरही बेतू शकते. या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी काही कडक पावले उचलली आहेत. थर्टी फर्स्टच्या रात्री मद्याच्या पार्त्या झोडणाऱ्यांनी घरी परतण्यासाठी स्वतः वाहन चालवू नये यासाठी वाहतूक पोलिसांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

# डोंबिवली सागाव परिसरातील चेंबरमधून तपकिरी धूर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली - डोंबिवली एमआयडीसी क्षेत्रातील सागाव भागात एका चेंबरमधून रविवारी तपकिरी रंगाचा धूर बाहेर येत होता. यावेळी परिसरात उग्र वासाची दुर्गंधी पसरली होती. बराच उशीर हा प्रकार सुरू होता, असे स्थानिकांनी सांगितले. हिरवा पाऊस, गुलाबी पाऊस, गुलाबी रंगाचा रस्ता अशा अनेक कारणांनी डोंबिवली एमआयडीसी गाजत असताना, आता एमआयडीसी हद्दीतील चेंबरमधून तपकिरी रंगाचा धूर बाहेर येत असल्याने खळबळ उडाली आहे.**

गेल्या काही दिवसापूर्वीच एमआयडीसी भागात गुलाबी रंगाचा रस्ता झाल्याचे दिसून आले होते. त्यानंतर पुन्हा रविवारी एका चेंबरमधून तपकिरी रंगाचा धूर बाहेर येत आहे, असे दृश्य सागाव भागात दिसू लागले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले. सागाव भागातील एका चेंबरमधून तपकिरी रंगाचा धूर बाहेर येत आहे असे या भागातील रस्त्यावरून जात असलेल्या रहिवाशांना समजले. त्यांनी तातडीने ही माहिती परिसरातील उद्योजक, जाणकार रहिवाशांना दिली. तोपर्यंत परिसरात चेंबरमधून बाहेर पडत असलेला



धूर पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी जमली होती. जीवाला धोका नको म्हणून काही नागरिकांनी या भागातील रस्त्यावरून जाण्याऐवजी पर्यायी रस्त्यावरून जाणे पसंत केले. कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे (कामा) पदाधिकारी नारायण माने, देवेन सोनी आणि इतर उद्योजकांना ही माहिती समजताच ते घटनास्थळी आले. तोपर्यंत चेंबरमधून तपकिरी धूर येणे थांबले होते. या पदाधिकाऱ्यांनी आपल्या यंत्रणेच्या साहाय्याने ज्या चेंबरमधून तपकिरी धूर येत होता. त्याचे नमुने ताब्यात घेतले. ते नमुने प्रयोगशाळेत आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत, असे उद्योजक देवेन सोनी यांनी सांगितले.

या नमुन्याच्या तपासणीनंतर जो शोध अहवाल येईल त्याप्रमाणे हा धूर कोणत्या कंपनीच्या माध्यमातून चेंबरमधून बाहेर आला त्याचा अभ्यास करून त्या कंपनीवर कठोर कारवाई करण्यासाठी 'कामा' संघटनाही पुढाकार घेईल. यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही, असे उद्योजक सोनी यांनी सांगितले. मागील काही वर्षापासून डोंबिवली एमआयडीसी कंपन्यांमधील स्फोट, त्यामुळे होणारी जीवित वित्त हानी, हिरव्या रंगाचा पाऊस, गुलाबी रंगाचा पाऊस, गुलाबी रस्ते यामुळे डोंबिवली एमआयडीसी नेहमीच वेळोवेळी राज्यभर चर्चेचा विषय झाली आहे.

# पनवेलमध्ये राजकीय वातावरण तापले

## बंडखोरी रोखण्यासाठी शेवटच्या क्षणी एबी अर्जांचे वितरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. २९ (बातमीदार)**

पनवेल महापालिकेची तब्बल आठ वर्षांनंतर निवडणूक होत असल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना उमेदवारी अर्जासोबत एबी अर्ज जोडण्यासाठी उद्या मंगळवारी (ता. ३०) दुपारी ३ वाजेपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे शेवटच्या क्षणी गुपचूप एबी अर्ज वितरित केले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनेक पक्ष शेवटच्या दिवशीच उमेदवारांची यादी जाहीर करून संभाव्य बंडखोरी रोखण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे.

सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या प्रचंड वाढली असून, त्यामुळे बंडखोरी टाळणे हे पक्षनेतृत्वापुढील मोठे आव्हान ठरले आहे. उमेदवारी जाहीर करण्यात होत असलेला विलंब, रुसवे-फुगवे आणि अंतर्गत नाराजी यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांनी कोणताही धोका पत्करू नये, म्हणून विशेष काळजी घेतली आहे. अर्ज बाद होऊ नये, यासाठी अनेकांनी एक डमी अर्ज, एक अपक्ष अर्ज आणि एक पक्षाचा अर्ज असा 'फॉर्म्युला' अवलंबल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अर्ज विक्री व दाखल करण्याच्या ठिकाणी मोठी गर्दी उसळली आहे. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज विक्री व दाखल करण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. उद्याचा दिवस अर्ज भरण्यासाठी शेवटचा असल्याने वातावरणात चांगलीच धावपळ पाहायला मिळत आहे. मात्र, अद्यापही अनेक पक्षांनी अधिकृत उमेदवारी जाहीर न केल्याने इच्छुकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. इच्छुकांची संख्या वाढल्याने मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

# भिवंडीत स्वीप पथकातर्फे मतदान जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 अंतर्गत मा. आयुक्त अनमोल सागर व मा. अति. आयुक्त नयना ससाणे व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील नागरीकांना मतदानाचे महत्व पटवुन देण्याकरीता मनपा शाळा क्र. 48 व मनपा शाळा क्र. 33 फेणेगांव व कामतघर गांव यादोन्ही गावांमध्ये मुला/मुलींची रॅली काढुन मतदानाची शपथ घेऊन नागरीकांना दि. 15 जानेवारी 2026 रोजी आवश्य मतदान करणेकामी जाहीर आव्हान करणेत आले आहे. याप्रसंगी सहाय्यक नोडल अधिकारी श्रीम. कल्पना तळपाडे व श्री. राहुल नाडेकर तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, श्री. उपेंद्र संबारी, शिक्षक, श्री. सत्यनारायण गोलापेल्ली, श्री. संजय गोदके. श्री. पंडीत केणे, श्री. विकी जाधव, श्री. पंकज राऊत याप्रसंगी यांनी उपस्थीत राहुन सक्रीय सहभाग घेण्यात आला.

## "दहा वर्षात काय केलं"

### ठाण्यात नागरिकांनी अडवली निवडणूक प्रचार रॅली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकांसाठी अद्याप तरी कोणत्याच राजकीय पक्षांनी उमेवारांचीच यादी जाहीर केलेली नाही. मात्र, माजी नगरसेवकांनी तसेच काही इच्छुकांनी पुन्हा उमेदवारी मिळेल, या आशेवर प्रभागात प्रचार सुरू केला आहे. अशीच प्रभाग क्रमांक १५ मधील लोकमान्यनगर पाडा नंबर १ येथे शिंदेंच्या शिवसेनेच्या माजी नगरसेवकांनी प्रचार रॅली काढली होती. मात्र, नागरिकांनी ही रॅली अडवली आणि" दहा वर्षात काय केलं" असा जाब विचारला.

प्रभाग क्रमांक १४, लोकमान्य नगर परिसरात निवडणूक प्रचारासाठी शिंदेंच्या शिवसेनेचे माजी नगरसेवक गेले होते. माजी नगरसेवक दिलीप बारटक्के, विजय चिंदरकर, संदीप डोंगरे, राकेश शिंदे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रॅली अडवत नागरिकांनी थेट जाब विचारला आणि आपला संताप व्यक्त केला. हातात निषेधाचे पोस्टर घेऊन नागरिक रस्त्यावर उतरले होते. ठाणेकर तुपाशी, प्रभाग १४ नंबर उपाशी" असे बॅनर नागरिकांनी हातात घेऊन संताप व्यक्त केला. गेल्या दहा वर्षांपासून प्रभागात कोणताही ठोस विकास झाला नसल्याचा आरोप नागरिकांनी यावेळी केला. दरम्यान, आपण यावर भेटून बोलूया असे बारटक्के यांनी नागरिकांना सांगितले आणि त्यानंतर नागरिकांमधून वाट काढत प्रचार रॅली पुढे निघून गेली.

# शहापूर : काळ्या बाजारात सरकारी धान्याची विक्री


## दीड लाखाचे सरकारी रेशनिंग धान्य जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी) :** मुंबईतील मुलुंड येथील रेशनिंग दुकानातील सरकारी धान्य शहापूर येथे काळया बाजारात विक्रीसाठी नेत असल्याची खबर भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयवंत सोनावणे यांच्या विशेष पोलीस पथकाने मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी जवळील राजनोली नाका येथे सापळा रचून लाखो रुपये किंमतीचे धान्याने भरलेली पिकअप जीप गाडी पकडली.या घटनेने रेशनिंगच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांमध्ये खळबळ माजली आहे.या गंभीर गुन्हया संदर्भात पोलिसांनी दोन रेशन दुकानदारांसह बोलेरो पिकप चालका विरोधात गुन्हा कोनगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून गरीब जनते साठी रेशनिंग वर वितरीत केला जाणारा विविध प्रकारचे धान्य काळया बाजारात विक्री केले जात आहे. याबाबत पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केली आहे. मात्र ठोस कारवाई होत नसल्याने धान्य काळाबाजार विचार विक्री करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुलुंड येथील रेशनिंग दुकानदार पियुश ओधाजी ठक्कर,रमेश भानुशाली यांनी आपल्या दुकानातून नागरिकांना शासकीय धान्य साठ्यातून वितरणासाठी आलेला तांदूळ,गहू,साखर,डाळी इत्यादी एक लाख ४९ हजार रुपयांचा धान्यसाठा टेम्पो चालक रविकिशन विजयकुमार सिंग याने बोलेरो पिकअप क्रमांक ( एम एच ०३ सी पी ८५९७ )मध्ये भरून शहापूरच्या दिशेने घेऊन जात असल्याची माहित भिवंडी गुन्हे शाखेचा पोलिसांना मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयवंत सोनवणे यांचा मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक धनराज केदार,सपोनि सुनील साळुंखे यांच्या पोलीस पथकाने राजनोली नाका या ठिकाणी सापळा रचून दुपारी सापळा रचून संशयित पिकअप टेम्पो येताच गाडी थांबवून तपासणी केली.टेम्पो मध्ये दोघा दुकानदारांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी रेशन दुकानावर गरिबांसाठी सरकारकडून पुरवले जाणारे धान्यसाठा काळया बाजारात विक्री साठी घेऊन जात असल्याचे निष्पन्न झाले.त्यामुळे भिवंडी गुन्हे शाखेचे सपोनि सुनील साळुंखे यांनी कोनगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी पियुश ठक्कर,रमेश भानुशाली व टेम्पो चालक रविकिशन सिंग या तिघांविरोधात भा.न्या.सं. ३१८ (४), ३(५) सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ से कलम ३,७.९ नुसार गुन्हा दाखल करून एकुण आठ लाख ४९ हजार रुपये किमतीचा टेम्पो सह धान्यसाठा जप्त केला आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखेचे सहा.पोलिस निरीक्षक धनराज केदार हे करीत आहेत.




**महाराष्ट्र शासन**

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे, यांचे कार्यालय,**
**पत्ताः कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, कळवा (प.) जि. ठाणे**
**दूरध्वनी क्र. २५४२८१२७, ई-मेल पत्ताः-eeemilsdnt@gmail.com**

**निविदा सूचना क्र. ब-१ / ७८ / जिजअ /सन २०२५-२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग कळवा-ठाणे मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम (सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत) कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा- ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव |
|---|---|
| १ | मौजे. खापरीकामतपाडा ता. मुरबाड जि.ठाणे येथे गेटेड को.प.बंधारा / गेटेड सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे साठी सर्वेक्षण व अन्वेषण करणे. रु. ६, १०,१४८/- |

६. कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/१२/२०२५ ते ०६/०१/२०२६ दुपारी १६.०० या कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध असतील.

७. पूर्ण भरलेले निविदा फॉर्म दिनांक ३०/१२/२०२५ ते ०७/०१/२०२५ दुपारी १६.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.

८. कोरे निविदा फॉर्म सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र तसेच पॅनकार्ड, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर केल्यानंतर व निविदा शुल्क भरल्यानंतर देण्यात येतील.

९. निम्नस्वाक्षरीकार हे कोणताही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.

१०. सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध राहील.

जा.क्र. जिजअ (मृवजसं)/ले-२/४४१७/ सन २०२५
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग,
कळवा-ठाणे यांचे कार्यालय
दिनांक- २६.१२.२०२५

**सही/-**
**(फराद खान)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**कळवा-ठाणे**

प्रत - उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग, बदलापूर, शहापूर यांना नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यासाठी.
प्रतः- नोटीस बोर्ड प्रसिध्दीसाठी

*जावक क्रमांक : जिमाका/ठाणे/जाहि/2025-26/152

# शालेय विद्यार्थ्यांची रॅली माध्यमातून मतदार जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मतदानाबाबतची जागरुकता जन मानसामध्ये अधिकाधिक वाढावी, मतदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचावे या दृष्टीकोनातून कल्याण डोंबिवली महापालिकेचे स्वीप नोडल अधिकारी संजय जाधव आणि सहाय्यक अधिकारी विजय सरकटे यांच्याव्दारे विविध उपक्रम राबिवले जात आहेत. यामध्ये महापालिका क्षेत्रातील विविध शाळा, महाविदयालय यामध्ये चित्रकला स्पर्धा, मतदान जनजागृतीची शपथ असे उपक्रम राबविण्यात आले. त्याप्रमाणे "युवर वोट-युवर पॉवर" "आपले मत - आपली जबाबदारी" अशा आशयाचे फलक हाती घेऊन शालेय विदयार्थ्यांनी आपापल्या शाळेच्या परिसरात मतदान जनजागृतीपर रॅली काढल्या. या रॅलीमध्ये अनेक विदयार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होऊन मतदार जनजागृतीबाबत आपला संदेश नागरिकांपर्यंत/मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी मतदार जनजागृती उपक्रमास आपला हातभार लावला.





**भारतीय जनता पार्टीतर्फे दीपेश पुंडलिक म्हात्रे आणि जयेश पुंडलिक म्हात्रे यांनी आजचा सकाळी अकरा वाजता "ह" प्रभाग कार्यालयामध्ये आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.**

# उल्हासनगर मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025–26 च्या अनुषंगाने, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, अचूक व सुरळीतपणे राबविण्याच्या दृष्टीने निवडणूक कामकाजास्तव नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.से. यांच्या मार्गदर्शनाखाली शहिद अरुणकुमार वैद्य (टाऊन हॉल) सभागृह, उल्हासनगर-3 येथे सकाळ व दुपार अशा दोन सत्रांमध्ये करण्यात आले.

सदर प्रशिक्षण वर्गामध्ये ईव्हीएम (Electronic Voting Machine) द्वारे मतदान करण्याच्या प्रक्रियेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विजयकुमार वाकोडे व डॉ. संजय शिंदे यांनी प्रशिक्षणास आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये क्षेत्रीय अधिकारी (ZO), मतदान केंद्रांवर नियुक्त केलेले मतदान केंद्राध्यक्ष (PRO) तसेच प्रथम मतदान अधिकारी (FPO), OPP-1, OPO-2 व शिपाई यांनी अनिवार्यरित्या सहभाग नोंदविला.



प्रशिक्षण वर्गाचे कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मतदान केंद्राध्यक्ष (PRO) यांचा औपचारिक सत्कार उल्हासनगर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. श्री. किशोर गवस, उपआयुक्त (निवडणूक) श्रीम. विशाखा मोटघरे, उपआयुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली चौगले, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांचेसाठी मतदान प्रक्रियेविषयीची हस्तपुस्तिका (हँडबुक), ऑनलाईन लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आली. तसेच मतदान यंत्र सील करणेचे व्हिडीओ व मतदानाविषयी वारंवार विचारले जाणारे प्रश्न यांची माहिती QR कोडच्या माध्यमातून मोबाईलवर डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सदर सुविधेचा लाभ घेत अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदर पुस्तिका डाऊनलोड करून घेतली. याबाबत सदर पुस्तिकेतील मार्गदर्शक सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे अभ्यासाव्यात, असे निर्देश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस यांनी दिले. तसेच मतदाराने आपले नाव मतदान यादीत शोधण्यासाठी "Google मध्ये https://mahasecvoterlist.in/ टाईप करून लिंक ला Click करा." असे आवाहन याठिकाणी लावण्यात आलेल्या माहितीपर बॅनर्सद्वारे करण्यात आले.

मतदान केंद्राध्यक्ष (PRO) व प्रथम मतदान अधिकारी (FPO), OPP-1, OPO-2 व शिपाई यांच्यासाठी पुढील प्रशिक्षण वर्ग सोमवार, दिनांक 05 जानेवारी 2026 रोजी शहिद अरुणकुमार वैद्य (टाऊन हॉल) सभागृह, उल्हासनगर-3 येथे आयोजित करण्यात येणार असून, सदर प्रशिक्षणास उपस्थित राहणे संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनिवार्य राहील, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सदर "कर्मचारी प्रशिक्षण वर्ग" कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त मा. श्री. किशोर गवस, निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बाळासाहेब तिडके, श्री. गणेश सांगळे, श्री. विशाल जाधवर, श्री. विजयकुमार वाकोडे, श्री. मुकेश पाटील, डॉ. संजय शिंदे व संबंधित सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच तहसिलदार श्रीम. कल्याणी कदम, महापालिका उपआयुक्त (निवडणूक) श्रीम. विशाखा मोटघरे, उपआयुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली चौगले, सहा.आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे, सहा. आयुक्त (साप्रवि) श्रीम. सलोनी निवकर, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, सर्व क्षेत्रीय अधिकारी (ZO), मतदान केंद्रांवर नियुक्त केलेले मतदान केंद्राध्यक्ष (PRO) व प्रथम मतदान अधिकारी (FPO), OPP-1, OPO-2, शिपाई व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये अन्वी शुक्लाचा राष्ट्रीय विक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडीच्या अन्वी अनुपकुमार शुक्लाने ३० मिनिटांत सर्वाधिक राउंड हाऊस किक्स मारून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये राष्ट्रीय विक्रम नोंदवण्याचा मान मिळवला आहे.या कामगिरीबद्दल मान्यवर नागरिकांनी तिचे अभिनंदन करून पुष्पगुच्छ देत नुकताच सत्कार करण्यात आला.

व्हिजन मार्शल आर्ट्स अकादमीने २३ नोव्हेंबर २०२५ रोजी हैदराबादच्या आरआर जिल्ह्यातील सरूरनगर इनडोअर स्टेडियममध्ये "३० मिनिटांत सर्वाधिक राउंडहाऊस किक्स" कार्यक्रम आयोजित केला होता. याकार्यक्रमात १० राज्यांतील ९२७ स्पर्धकांनी भाग घेतला आणि एकूण ८५५,४६० किक्सचे लक्ष्य गाठले. सहभागी स्पर्धक ८ ते ७० वर्षे वयोगटातील होते, ज्यात यलो बेल्टपासून ते ७ व्या डॅन ब्लॅक बेल्टपर्यंतचे मार्शल आर्टिस्ट होते. या स्पर्धेत भिवंडीतील ब्रेव्ह युथ मार्शल आर्ट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अश्लील अन्वी अनुपकुमार शुक्ल (१३) हिने ३० मिनिटांत सर्वाधिक



राउंडहाऊस किक्स मारून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये राष्ट्रीय विक्रम नोंदवण्याचा मान मिळवला आहे. लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या संपादिका वत्सला कौल बॅनर्जी यांच्या स्वाक्षरीसह होलोग्रामद्वारे प्रमाणित प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये राष्ट्रीय विक्रम नोंदवल्याबद्दल अन्वी अनुपकुमार शुक्ला यांचे भिवंडीतील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. ३० मिनिटांत जास्तीत जास्त राउंडहाऊस किक करण्याचा हा पराक्रम साध्य करण्यासाठी तिचे समर्पण आणि सर्व ९२७ सहभागींचे प्रयत्न खरोखरच प्रेरणादायी आहेत असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जाते आहे.

# पेण येथे कराटे बेल्ट परिक्षा संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण येथे युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन इंडिया ह्यां संस्थेच्या वतीने पेण येथील नगरपालिका मैदानात यलो बेल्ट ते ब्लॅक ब्राऊन बेल्ट पर्यंतच्या विद्यार्थ्यांची बेल्ट परीक्षा घेण्यात आली यामध्ये 98 विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली .सदरची परीक्षा युनाइटेडचे अध्यक्ष डॉ.मंदार पनवेलकर उपाध्यक्ष रविंद्र म्हात्रे ह्यांच्या उपस्थितित घेण्यात आली. ह्यावेळी मुख्य परिक्षक ओसेन्साय विनायक पाटील ह्यांच्या मार्गदर्शना खाली सेन्साय निलेश ओव्हाळ प्राजक्ता तेटमे अयुष पाटील, स्वरांगी घैसास, रितुल म्हात्रे, हर्षाली पेणकर, महमद अली,अयुष रसाळ ,अयेशा बेगम, भक्ती भानुसकर,रितेष पवार,दिपेश जाधव, पार्थ निकम, ओजस म्हात्रे, आर्यन म्हात्रे ह्यांनी परिक्षक म्हणून काम पाहीले सर्व बेल्ट परिक्षेत उतिर्ण झालेल्या विद्यार्थाना बेल्ट व सर्टिफिकेट देऊन सन्माननीय करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले व शुभेच्छा देण्यात आल्या.

# एकनाथ देसले यांना मुरबाडरत्न (कला क्षेत्र) पुरस्कार प्रदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : डॉक्टर व इंजिनिअर फाऊंडेशन क्लब मुरबाड यांच्या वतीने मुरबाडरत्न २०२५ (कला क्षेत्र) पुरस्कार प्रदान सोहळा साजई, ता. मुरबाड येथे अत्यंत साधेपणाने व भावनिक वातावरणात संपन्न झाला. कला क्षेत्रातील दीर्घकालीन साधना, सामाजिक जाणीव आणि सर्जनशील योगदानाची दखल घेत ज्येष्ठ अष्टपैलू लेखक व कलावंत एकनाथ कुसुम महादू देसले यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारामध्ये शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र,



सन्मानपत्र, भगवद्गीता, शिवमुद्रा तसेच भेटवस्तू यांचा समावेश होता. सोहळयाचे संपूर्ण नियोजन, व्यवस्था व अंमलबजावणी फाऊंडेशनच्या सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध व समर्पित भावनेने पार पाडली.


संस्थेच्या कार्यतत्त्वांनुसार, हा पुरस्कार सोहळा पूर्णतः राजकीय हस्तक्षेपाशिवाय, केवळ निवडक आप्तस्वकीय, कुटुंबीय व क्लबच्या सदस्यांच्या उपस्थितीत पार पडला. देसले कुटुंबीय व निकटवर्तीयांची उपस्थिती या सोहळयाला आपुलकीचा व आत्मीयतेचा भाव देणारी ठरली.

"एक वर्ष – एक तालुका – एक कार्यक्षेत्र – एक सर्वोच्च आदर्श व्यक्ती" या संकल्पनेतून दिला जाणारा मुरबाडरत्न पुरस्कार हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, संपूर्ण मुरबाड तालुक्याच्या कला व सांस्कृतिक परंपरेचा गौरव असल्याची भावना यावेळी उपस्थितांमध्ये प्रकर्षाने दिसून आली.

तालुक्यातीलच क्लब सदस्यांच्या हस्ते, तालुक्यातीलच निवडक व सर्वोत्तम व्यक्तीस, त्यांच्या स्वतःच्या गावी व कुटुंबीयांच्या साक्षीने सन्मानित करण्याची परंपरा हीच मुरबाडरत्न पुरस्काराची वैशिष्ट्यपूर्ण ओळख असल्याचे या सोहळयातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.




# कासणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी मंदा भोईर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील कासणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मंदा दिपक भोईर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

कासणे या ग्रामपंचायतीमध्ये एकूण दहा सदस्य संख्या असून ग्रामपंचायतीचे कार्यरत उपसरपंच अनंता दामा गोंधळी यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केलेल्या मंदा दिपक भोईर यांच्या विरोधात कोणताही अर्ज नसल्याने त्यांची बिनविरोध उपसरपंचपदी निवड झाली आहे.

सरपंच अजय विलास घाटाळ व ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद केशव भेरे यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. तर या निवडीवेळी भगवान भोईर, नाना गोंधळी, गजानन ठाकरे, पुंडलिक दळवी, रघुनाथ हाळके, अमोल दळवी, योगेश ठाकरे, नितीन हाळके, शंकर भोईर, शरद हाळके, रघुनाथ भागडे, अनंता भोईर, निलेश हाळके विठ्ठल भोईर, रविंद्र भोईर तसेच ग्रामपंचायत सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सभापती दयानंद पाटील यांच्या हस्ते पडघा येथील भात खरेदी केंद्राचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित या संस्थेच्या वतीने आधारभूत भात खरेदी केंद्राचे उद्घाटन सभापती दयानंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आल्याने परिसरातील भात उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

पडघा व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना जवळच भात खरेदी केंद्र उपलब्ध व्हावे यासाठी शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित पडघा ही सहकारी संस्था प्रयत्नशील होती. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले



असुन मार्केटिंग फेडरेशन ठाणे अंतर्गत पडघा येथे आधारभूत भात खरेदी केंद्राला शासनाकडून मंजूरी मिळाली.असुन पडघा भादाणे रस्त्यावरील भिवंडी कृषी उत्पन्न

## जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

बाजार समितीच्या गोदामामध्ये भात खरेदी केंद्राचे उद्घाटन शेतकरी सहकारी भातगिरणीचे सभापती दयानंद पाटील यांच्या हस्ते सोमवारी करुन भात खरेदीचा शुभारंभ करण्यात आला यावेळी पडघा सेवा सहकारी सोसायटीचे सभापती दत्तात्रेय पाटोळे, तळवली सेवा सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार भातगिरणी उपसभापती भास्कर पाटील संचालक विष्णू पाटील,अजय पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व भातगिरणी संचालक विलास पाटील, गोपीनाथ कथोरे, रामचंद्र पाटील, व्यवस्थापक शितल कशीवले, संचीता विशे उपस्थित होते. या भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना एक क्वीटंल भाताला २३४० रूपये हमीभाव मिळणार असुन त्यासाठी आवश्यक कागदपत्रासह नोंदणी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.असुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन शेतकरी सहकारी भातगिरणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे..

# ३० वर्षांनी मित्र मैत्रिणींचा गेट टुगेदर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : शाळा आणि शाळेतील मित्र एक अनोखा संगम, त्यातल्या त्यात कॉलेज मित्र मैत्रीण म्हणजे अस्सल मैत्री, निस्वार्थी मैत्री आणि त्यातून एकमेकांत तयार झालेले प्रेमाचे बंध हे आयुष्यभर जपले जातात. ही प्रेमाची शिदोरी कायम आयुष्यात कामाला येते. मैत्री निस्वार्थी प्रांजळ आणि कपटरहित असली पाहिजे. मैत्री चांगली असली तरी मित्र चांगले भेटणे महत्वाचं आहे .मैत्री आयुष्यभर टिकते काही लोक मात्र व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवतात. काहींना मित्र वापरून सोडून द्यायचे,व्यावहारिक उधारी करायची आणि नाते संपायचे असेही घडते पण मित्र याला अपवाद असतात अशीच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज पेण



येथील १९९५ चे बीएचे विद्यार्थी विद्यार्थीनी एकत्र येऊन एक छान असा गेट टुगेदर पार पाडला. ह्याला एकूण ४५ विद्यार्थी विद्यार्थीनी आले होते. त्यात सर्व मित्रानी आपला परिचय, आपला व्यवसाय नौकरी आणि राहण्याचे ठिकाण सांगून आपल्या भावना व्यक्त केल्या सर्व विद्यार्थ्यांना समोर येऊन बोलण्याची संधी दिली. सर्वजण बोलले व्यक्त झाले भावनांना बिनधास्त व्यक्त होताना बऱ्याच जणांनी झालेल्या चुकांची माफी मागितली, काहींनी अधुरे स्वप्न पुरे केल्याचा आनंद व्यक्त केला,काहींनी आम्हाला भेटल्यावर किमान बोलत तरी जावा असा अट्टाहास केला तर काहींनी मी काय होतो आज काय आहे आणि काय असलो तरी मित्रांशिवाय काहीच नाही. जीवनात चांगले मित्र असणं गरजेचं आहे. शेवटी प्रपंच, व्यवसाय आणि सगळं करूनही आपण मित्र म्हणून भेटल्यावर आपल्यात जे बोलणार आहोत त्यात नक्कीच फरक पडणार नाही. कोणी पोलिस नर्स शिक्षक ठेकेदार कामगार पत्रकार अधिकारी आदींसह अनेक जण कार्यक्रमाला उपस्थित सर्वच मित्र मैत्रिणींचे सर्वांनी एकमेकांचे आभार मानले. जीवनाच्या व्यस्ततेत विरंगुळा आणि अस्सल जुन्या आठवणीना उजाळा देण्यासाठी सर्व मित्र मैत्रिणी अगदी आनंदाने सामील झाले होते. चहा,नास्ता,शीतपेय, घेऊन दुपारी सोबत स्नेहभोजन केले सर्वांनी एकत्र जेवण केल्यानंतर विविध खेळ व गाणे गायन करून फोटो शेशन केले. सायंकाळी चहा घेऊन सर्वांनी अंतोरा पेण येथील नेचर टच फार्म येथून निरोप घेतला. तब्बल ३० वर्षांनी न भेटलेली ही पाखर एकदा एक दिवस सोबत राहून परत आपापल्या सांसारिक गुंतागुंतीत पुन्हा व्यस्त झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास पाटील यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनीच मेहनत घेतली विशेष मेहनत घेऊन सर्व विद्यार्थी विध्यार्थी नी यांना एकत्र करणारी मोहीनी पाटील हिचे विशेष आभार यावेळी सर्वांनी मांडले. आजचा गेट टुगेदर यशस्वी करण्यासाठी जयवंत म्हात्रे संजय पाटील विनायक तांडेल, जितेंद्र माळी धनाजी घरत नरेश पाटील,राजेंद्र पाटील,गणेश तांडेल,मंदा म्हात्रे, सुनिता पाटील,आदींसह मित्र मैत्रिणींनी आनंद लुटत मौजमजा करत विशेष सहकार्य केले.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024